५

तरुण भारत
शनिवार १७ ऑगस्ट२०२४



# 'आजच्या युवकांनी देशाला प्रगतीपथाकडे न्यावे'

कोल्हापूर : आजच्या युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी विश्वबंधूत्वाची शिकवण आपल्या प्रार्थनेतून दिली. त्याचे अवलंबन युवकांनी करावे, विद्यार्थ्यांमधील ज्ञानज्योत प्रज्वलीत करण्याचे काम गुरुदेव कार्यकर्त्यांनी करावे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी ध्वजारोहण समारंभात बोलताना मांडले. विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे संस्थेच्या सचिव मा.प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करणेत आले. एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी शानदार परेड संचलन सादर केले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या परिसरातील शाखा प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यैवेळी विवेकानंद कॉलेजमधील पुस्तक लेखक, सेट, पीएच.डी. पदवी प्राप्त् प्राध्यापकांचा सत्कार विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे हस्ते करणेत आला. यावेळी झुलॉजी विभाग प्रमुख डॉ.जी.के.सोनटक्के यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक स्टाफ सेक्रेटरी प्रा.ए.बी. वसेकर यांनी केले, आभार स्टाफ सेक्रेटरी प्रा डॉ ए बी दांगट यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा.सुप्रिया पाटील व प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.

Scanned with CamScanner

तरुण भारत संवाद
बुधवार, ४ सप्टेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये क्रीडा दिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्रीडा संस्कृती शासनासह पालकांमध्ये रुजली पाहिजे. ऑलिम्पिक स्पर्धा ही सर्व देश एकत्रित येऊन बंधूत्व व सहचार्याने राहण्यासाठी आयोजित केली जाते. त्यामुळे सर्व खेळाडूंच्या मध्ये समता, बंधूत्व , एकता व सहकार्याची भावना रुजली जाते, असे मत भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाचे मुख्य प्रशिक्षक अजित पाटील व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंमार हे होते. मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन समारंभाचे आयोजन महाविद्यालयाच्या आय.क्यु.ए.सी. विभाग व क्रीडा व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद व शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमा पूजन केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. कुंमार म्हणाले, खेळाडूंनी क्रीडा व शिक्षण या दोन्हींची योग्य सांगड घातली तर चांगले करिअर होऊ शकते. प्रा. मेजर एम. जी. गायकवाड म्हणाले, विद्यार्थ्यांनी जास्तीत खेळात भाग घेऊन खेळांचा प्रचार व प्रसार अधिक केला पाहिजे. त्यामुळे दैनंदिन जीवनात क्रीडा संस्कृती रुजण्यास खूप मदत होईल. प्रा. स्नेहल वरेकर यांनी खेळाडू कसे घडतात याविषयी माहिती दिली. प्रास्ताविक व स्वागत जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्रा. समीर पठाण यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. यावेळी रजिस्ट्रार आर. बी. जोग, डॉ. महेश कदम, एस. व्ही. चरापले, प्रा. किरण पाटील, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

# अभ्यासक्रमात बुद्धिबळाचा समावेश व्हावा

## गिरीश चितळे : 'चेस इन स्कूल' उपक्रम, दोन हजारांवर शिबिरार्थींना प्रशिक्षण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : 'शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बुद्धिबळ खेळाचा समावेश करावा,' अशी मागणी महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष व चेस इन स्कूल समितीचे अध्यक्ष गिरीश चितळे यांनी केली. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित 'चेस इन स्कूल' उपक्रमाअंतर्गत 'ट्रेन द ट्रेनर्स' शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना 'चेस इन स्कूल' (शाळेत बुद्धिबळ) उपक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थींसोबत मान्यवर, संयोजक, मार्गदर्शक उपस्थित होते.

भारतीय बुद्धिबळ संघटनेच्या संकल्पनेतून २०१४ मध्ये 'चेस इन स्कूल' हा उपक्रम भारतात सुरू करण्यात आला. त्याला कोरोना काळात ब्रेक लागला. येत्या शैक्षणिक वर्षापासून पुन्हा नव्या जोमाने महाराष्ट्रातील ५०० हून अधिक शाळांमध्ये बुद्धिबळचा प्राथमिक अभ्यास सुरू करण्याचा राज्य संघटनेचा मानस आहे. शिवाजी विद्यापीठात क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांच्या आग्रहास्तव भविष्यात 'चेस इन कॉलेज, युनिव्हर्सिटी' हा उपक्रम संघटना राबवेल. याचा शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला तर ते भारतातील पहिले विद्यापीठ ठरेल.

शिबिरात कोल्हापूर, इचलकरंजी, चंदगड, आजरा, सांगली, सातारा, फलटण, दापोली आदी ठिकाणांहून बुद्धिबळप्रेमी, शिक्षक, क्रीडा शिक्षक, पालक सहभागी झाले होते. मुख्य प्रशिक्षक उत्कर्ष लोमटे, मनीष मारुलकर यांनी दोन हजारांहून अधिक आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त शिबिरार्थींना सात तासांहून अधिक काळ प्रशिक्षण दिले.

शिबिराच्या शेवटी शंभर गुणांची परीक्षा घेण्यात आली. प्रावीण्यप्राप्त प्रशिक्षकांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, सिद्धांत शिंदे व कौस्तुभ गावडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. विकास जाधव, संतोष कुंडले, पंच भरत चौगुले, धीरज वैद्य व राष्ट्रीय पंच आरती मोदी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com



कोल्हापूर : महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना चेस इन स्कूल (शाळेत बुद्धिबळ) उपक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थींसोबत संयोजक, मार्गदर्शक.

# शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रमात बुद्धिबळाचा समावेश व्हावा

## गिरीश चितळे; महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचा कॅम्प

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात बुद्धिबळ खेळाचा समावेश व्हावा, अशी मागणी महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष व चेस इन स्कूल कमिटीचे चेअरमन गिरीश चितळे यांनी केली.

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना चेस इन स्कूल (शाळेत बुद्धिबळ) हा उपक्रम आगामी शैक्षणिक वर्षापासून पुन्हा नव्या जोमाने सुरू करत आहे. त्यासाठी आवश्यक 'ट्रेन द ट्रेनर्स' कॅम्पचे आयोजन राज्यभर करण्यात आले आहे. याची सुरुवात क्रीडानगरी कोल्हापुरातून करण्यात आली. विवेकानंद कॉलेजमध्ये या कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन चेस इन स्कूल कमिटीचे चेअरमन गिरीश चितळे, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, सिद्धांत शिंदे व कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. विकास जाधव, संतोष कुंडले, पंच भरत चौगुले, मनीष मारुलकर, उत्कर्ष लोमटे, धीरज वैद्य व राष्ट्रीय पंच आरती मोदी व्यासपीठावर उपस्थित होते.

शिबिरात कोल्हापूर, इचलकरंजी, चंदगड, आजरा, सांगली, सातारा, फलटण, दापोली येथील बुद्धिबळ प्रेमी शिक्षक, क्रीडा शिक्षक व पालक सहभागी झाले होते. मुख्य प्रशिक्षक उत्कर्ष लोमटे व मनीष मारुलकर यांनी २००० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त शिबिरार्थींना सुमारे सात तासांचे प्रशिक्षण दिले तसेच शंभर गुणांची परीक्षा घेतली.

प्रावीण्य प्राप्तांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

My Kolhapur Edition
Dec 17, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

तरुण भारत संवाद

मंगळवार २३ जुलै २०२४

# शुभम जाधवची राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजमध्ये बी. ए. भाग एकमधील शुभम जाधव याची सेकंड हॉकी इंडिया वेस्ट झोन चॅम्पियनशीप स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा छत्तीसगड येथे २१ ते २८ जुलै दरम्यान होणार आहे. पुणे येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या ८० खेळाडूमधून त्याची निवड झालेली आहे. शुभम जाधव याला प्रशिक्षक सागर जाधव व योगेश देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. शुभमच्या या यशाबद्दल



स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. त्याला जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, सुरेश चरापले यांचे प्रोत्साहन मिळाले.

# विवेकानंदच्या अंकुश हाक्के याचे आंतरविद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेत यश



कोल्हापूर : भुवनेश्वर येथील कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विद्यापीठ येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरचा बी.ए. भाग ३ मध्ये शिकत असणारा अंकुश लक्ष्मण हाक्के याने यश संपादन केले.

अंकुश हाक्केने १ तास ६ मिनिट २१ सेकंद वेळत स्पर्धा पूर्ण करून तृतीय क्रमांक पटकावला. त्यामुळे तो जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतर विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी पात्र ठरला आहे.

अंकुश हाक्के याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्य नगरी । शनिवार, ४ जानेवारी २०२५



# अंकुश हाक्केचे मॅरेथॉन स्पर्धेत यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विद्यापीठ, भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये अंकुश हाक्के याने तब्बल १ तास ६ मिनिटे २९ सेकंद वेळ देत स्पर्धा पूर्ण करत तृतीय क्रमांक पटकावला.

तो विवेकानंद महाविद्यालयात बी.ए. भाग ३ मध्ये शिकत आहे. जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी तो पात्र ठरला आहे. त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत मंगळवार २२.१०.२०२४

# वडणगेच्या श्रेयाला तायक्वांदोमध्ये सुवर्ण

वडणगे : येथील श्रेया विश्वास



बराले हिने जीकेजी कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत ४६ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. ती स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची खेळाडू आहे. तिची १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

26.10.24

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४

# श्रेया बराले हिला तायक्वाँदोमध्ये सुवर्ण

**वडणगे :** येथील श्रेया विश्वास बराले हिने शिवाजी विद्यापीठांतर्गत जयसिंगपूर येथे झालेल्या आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ किलो वजनी गटात सुवर्णपदक



पटकावले. ती स्वामी विवेकानंद महाविद्यालयाची खेळाडू आहे. अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वाँदो स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रशिक्षक पद्माकर कांबळे, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

# अ. भा. आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कश्मीर गुलमर्ग येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या गायत्री लोळगे, वैष्णवी पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करत आईस स्टॉक खेळामध्ये टीम टार्गेट व टीम डिस्टन्स खेळ प्रकारात सुवर्णपदक मिळविले. स्पर्धांसाठी भारतामधून विविध विद्यापीठातून ४५ विद्यापीठांचा समावेश होता.

यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner